दुष्काळ घोषित करण्याबाबत कार्यपध्दतीअंतर्गत
जिल्हास्तरीय समितीमध्ये बदल करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण - २०१७/प्र.क.१७३/२०१७/म-७
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २७ मार्च, २०१८

वाचा -

शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण - २०१७/प्र.क.१७३/२०१७/म-७, दिनांक ७.१०.२०१७

प्रस्तावना -

दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मध्ये विहित करण्यात आलेल्या निर्देशांकाच्या आधारे राज्यामध्ये दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करून दुष्काळ जाहीर करण्यासाठी शास्त्रीय निकष व सुधारित कार्यपध्दती संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. सदर कार्यवाही करण्यासाठी जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या रचनेमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये जिल्हयामध्ये दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीची पुनर्रचना करण्यात येत असून जिल्हयातील निवासी उपजिल्हाधिकारी यांना सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून निर्देशित करण्यात येत आहे. खरीप-२०१८ च्या हंगामापासुन पुनर्रचित जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती खालीलप्रमाणे राहील :

जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती (District Drought Monitoring Committee) :-

१)	जिल्हाधिकारी	-	अध्यक्ष
२)	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	-	सदस्य
३)	जलसंपदा विभागाचे जिल्हास्तरीय विभाग प्रमुख	-	सदस्य
४)	वरिष्ठ भूवैज्ञानिक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा	-	सदस्य
५)	महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लीकेशन सेंटर,नागपूर या संस्थेतील तज्ञ व्यक्ती (आवश्यकतेनुसार)	-	निमंत्रित सदस्य
६)	जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी	-	सदस्य
७)	निवासी उपजिल्हाधिकारी	-	सदस्य - सचिव
८)	समितीस आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी	-	निमंत्रित सदस्य

२. जिल्हास्तरीय समित्यांनी आपल्या जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी दुष्काळासंदर्भात विहित करण्यात आलेल्या विविध शास्त्रीय निर्देशाकांचा तपशील प्राप्त करावा व त्याचे विश्लेषण करून त्याबाबतचा अहवाल विहित विवरणपत्रात संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कालावधीत संबंधित विभागीय आयुक्तांमार्फत राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीकडे विहित कालावधीत सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१२३१०४७११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.03.27 12:32:38 +05'30'

(सु.ह.उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन,मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई ,
३. मा विरोधी पक्ष नेते, विधानसभा/विधान परिषद, विधानभवन,मुंबई,
४. महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
५. मा.मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई
७. अपर मुख्य सचिव (कृषी), मंत्रालय,मुंबई,
८. प्रधान सचिव (महसूल),मंत्रालय,मुंबई
९. प्रधान सचिव/सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता), मंत्रालय,मुंबई,
१०.प्रधान सचिव/सचिव (पदुम), मंत्रालय,मुंबई,
११.प्रधान सचिव/सचिव (जलसंपदा), मंत्रालय,मुंबई,
१२.प्रधान सचिव/सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग), मंत्रालय,मुंबई
१३.प्रधान सचिव/सचिव (राहयो व जलसंधारण), मंत्रालय,मुंबई
१४.प्रधान सचिव/सचिव (ग्रामविकास विभाग), मंत्रालय,मुंबई
१५.प्रधान सचिव/सचिव (अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग),मंत्रालय,मुंबई

१६.प्रधान सचिव/सचिव (उर्जा),उद्योग,उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई

१७. प्रधान सचिव/सचिव (महिला व बाल विकास विभाग),मंत्रालय,मुंबई

१८. विभागीय आयुक्त,कोकण/पुणे/औरंगाबाद/नागपूर/अमरावती/नाशिक

१९. आयुक्त (कृषी),महाराष्ट्र राज्य,पुणे,

२०. आयुक्त (पशुसंवर्धन),महाराष्ट्र राज्य, पुणे

२१. मुख्य अभियंता,जलविज्ञान प्रकल्प, नाशिक

२२. सर्व जिल्हाधिकारी

२३. मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा

२४. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व)

२५. मा.मंत्री(मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई

२६. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई

२७. संचालक, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लीकेशन सेंटर,नागपूर,

२८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,

२९. संचालक (कृषी),महाराष्ट्र राज्य,पुणे

३०. संचालक,आपत्ती व्यवस्थापन,मंत्रालय,मुंबई

३१. निवड नस्ती (कार्यासन - म/७).